म.टा.पु.पा.१०

# वीजदरवाढीच्या प्रस्तावाची पालघर, वसईमध्ये होळी

## महाराष्ट्र वीज ग्राहक संघटनेचे आंदोलन

म. टा. वृत्तसेवा, पालघर

### जनता दल (से), 'आप'चाही सहभाग

**वसई :** महावितरणाच्या वीजदरवाढीच्या प्रस्तावाची मंगळवारी वसईतही होळी करण्यात आली. वीज ग्राहक संघटना, आम आदमी पार्टी आणि जनता दल (से.) यांनी महावितरण अधीक्षक अभियंता कार्यालयासमोर आंदोलन केले. यावेळी जनता दलाचे (से), वसई-विरार शहर अध्यक्ष कुमार राऊत, पायस मच्याडो, जयश्री सामंत, फ्रान्सिस डाबरे, आपचे वसई अध्यक्ष जॉन परेरा, माकपचे मुकेश शर्मा, निर्भय जन संस्थेचे अध्यक्ष शातीयोग डाबरे यांच्यासह इतर उपस्थित होते.



महावितरण कंपनीने राज्यात विजेच्या दरामध्ये प्रति युनिट २.५५ रुपये, म्हणजेच सरासरी ३७ टक्के एवढी विक्रमी वाढ प्रस्तावित केली असून गेल्या २३ वर्षांतील ही सर्वात मोठी दरवाढ आहे. यामुळे सर्वसामान्य वीज ग्राहक, शेतकरी, छोटे उद्योगधंदे आदींवर अन्याय होणार आहे. त्यामुळे या दरवाढीचा निषेध करण्यासाठी महाराष्ट्र वीज ग्राहक संघटनेने पालघर येथील महावितरणच्या अधीक्षक अभियंता कार्यालयासमोर दरवाढीच्या प्रस्तावाची होळी केली.

दहा टक्क्यांहून अधिक दरवाढ करू नये, असा विद्युत. अपीलीय प्राधिकरण, नवी दिल्ली या न्यायालयाचा आदेश आहे. मात्र त्याला हरताळ फासून ही दरवाढ प्रस्तावित करण्यात आली आहे, असे सांगत संघटनेने महावितरणच्या पालघर कार्यालयासमोर घोषणाबाजी करून निदर्शने केली. शिष्टमंडळाने कार्यकारी अभियंत्यांना निवेदन दिले. यावेळी अध्यक्ष प्रकाश लवेकर, उपाध्यक्ष सुभाष मोरे, सचिव निखिल मेस्त्री, सहसचिव चंद्रकांत साखरे, कुणबी सेनेचे अविनाश पाटील यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.

लोकसत्ता पु.पा.३०

# विरारमध्ये रस्त्याच्या मधोमध रिक्षा थांबे

लोकसत्ता, विशेष प्रतिनिधी

**वसई :** विरार पश्चिमेकडील वाहतूक कोंडीची समस्या दिवसेंदिवस गंभीर होऊ लागली आहे. रिक्षाचालकांनी आता रस्त्यावरच रिक्षा थांबे तयार केल्याने नागरिकांना रस्त्यावरून चालणेही अवघड झाले आहे.



विरार पश्चिमेकडील रस्ते अरुंद असून त्यात दोन्ही बाजूने फेरीवाल्यांचे अतिक्रमण झाले आहे. त्यातच रिक्षाचालकांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याने वाहतूक कोंडीची मोठी समस्या निर्माण होत आहे. आता या रिक्षाचालकांनी पुन्हा रस्त्याच्या मध्येच थांबे तयार करून प्रवासी घेण्यास सुरुवात केली आहे.

विरार पश्चिमेला रेल्वे स्थानकाच्या बाहेर रिक्षा थांबे होते. रेल्वेने त्यांना जागा दिली होती. परंतु, तरीही रिक्षाचालक रस्त्यातच थांबून प्रवासी घेत असतात. विरार पश्चिमेकडून दोन्ही विवा महाविद्यालये, ग्लोबल सिटी आदी ठिकाणी जाण्यासाठी रिक्षाचालक रस्त्यात थांबू लागले आहेत. त्यामुळे मुळातच अरुंद असलेल्या रस्त्यावर मोठी वाहतूक कोंडी होऊ लागली आहे. यामुळे नागरिकांना या रस्त्यावरून चालणे कठीण झाले आहे. या भागातील फेरीवाल्यांवर तसेच बेशिस्त रिक्षाचालकांवर कारवाई करावी, अशी मागणी स्थानिकांनी केली आहे.

Scanned with CamScanner

लोकसत्ता पु.पा.३.



## खराटतारा येथे कारखान्याला भीषण आग

**वसई :** फायबरपासून सिनेमागृह तयार करणाऱ्या कारखान्याला भीषण आग लागल्याची घटना मंगळवारी सकाळी १० च्या सुमारास मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील खराटतारा येथे घडली आहे. या आगीत कोणीतीही जीवितहानी झाली नाही.

खराटतारा येथे फायबरपासून सिनेमागृह तयार करणारा कारखाना आहे. मंगळवारी सकाळच्या सुमारास अचानक या कारखान्यात भीषण आग लागल्याने खळबळ उडाली. या घटनेची माहिती वसई-विरार महापालिकेच्या अग्निशमन दलाला व मांडवी पोलिसांना मिळताच त्यांनी घटनास्थळी धाव घेतली. अग्निशमन दलाच्या जवानांनी दोन बंबाच्या साहाय्याने अवघ्या तासाभरात आगीवर नियंत्रण मिळविले. या आगीत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही. मात्र, मालमत्तेचे मोठे नुकसान झाले आहे. ही आग शॉटसर्किटमुळे लागली असल्याचा अंदाज वर्तविला जात आहे.

# पाणीटंचाईमुळे टँकर सक्रिय

## वसई-विरारमध्ये दूषित पाण्याची विक्री

**लोकसत्ता वार्ताहर**

**वसई :** वसई-विरार शहरात निर्माण होत असलेल्या पाणीटंचाईच्या समस्येमुळे पुन्हा टँकर सक्रिय झाले आहेत. पाण्याच्या वाढत्या मागणीमुळे काही ठिकाणी दूषित पाणी भरून त्याची विक्री केली जात असल्याचे प्रकार घडू लागले आहेत.

वसई-विरार शहराचे झपाट्याने नागरीकरण वाढू लागले आहे. त्यामुळे पाण्याची मागणीही प्रचंड प्रमाणात वाढली आहे. पालिकेकडून शहरात पाणीपुरवठा केला जात असला तरीही ते पाणी अपुरे पडू लागले आहे. त्यामुळे शहरातील सोसायट्यांना टँकरच्या पाण्यावर अवलंबून राहावे लागत आहे. सध्या उन्हाळा सुरू झाला असल्याने पाण्याची मोठी समस्या निर्माण झाली आहे. या वाढत्या पाणीटंचाईमुळे शहरात टँकरच्या पाण्याला मागणी वाढली आहे. त्यामुळे टँकरही सक्रिय झाले आहेत. नालासोपारा, विरार, नायगाव, वसई अशा सर्वच ठिकाणच्या रस्त्यावर हजारोंच्या संख्येने टँकर धावत आहेत.

परंतु, टँकरद्वारे पुरविल्या जाणाऱ्या पाण्याच्या शुद्धतेबाबतही प्रश्न निर्माण होऊ लागले आहेत. काही टँकर चालक हे नागरिकांना दूषित पाणी भरून विक्री करू लागले आहेत. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होण्याची भीती नागरिकांमधून व्यक्त करण्यात येत आहे.

### पालिकेचे अतिरिक्त पाणी लांबणीवर

वसई-विरार शहरात पालिकेच्या सूर्या, पेल्हार, उसगाव या तिन्ही प्रकल्पांतून प्रतिदिन २३० दशलक्ष लिटर इतका पाणीपुरवठा केला जातो. परंतु, हे पाणीसुद्धा अपुरे आहे. त्यामुळे एमएमआरडीएने सूर्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेतून ४०३ दशलक्ष लिटरचे काम सुरू आहे. त्यातून वसई-विरार शहराला १८५ दशलक्ष लिटर पाणी मिळणार आहे. मार्चमध्ये हे पाणी उपलब्ध होणार होते. मात्र, अजूनही त्याचे काम पूर्ण न झाल्याने ते पाणी लांबणीवर पडले आहे.

### रस्तेही निसरडे

वसई-विरार शहरातील विविध ठिकाणच्या भागात पाणीपुरवठा करणाऱ्या टँकरमधून होणाऱ्या पाणी गळतीमुळे शहरातील रस्ते ओलेचिंब राहू लागले आहेत. सातत्याने हे पाणी सांडतच असल्याने येथून प्रवास करणाऱ्या अन्य वाहनचालकांचा प्रवास धोकादायक झाला आहे. याशिवाय काही टँकरचालक हे अधिक फेऱ्या मारण्यासाठी बेदरकारपणे टँकर चालवीत असल्याने अपघाताचा धोका आहे.




Scanned with CamScanner

पुढारी ५.५.४

# फास्ट टॅग रिचार्जच्या नावाखाली फसवणूक

## डॉक्टरने गमावले ९९ हजार रुपये

**मिरा रोड : पुढारी वृत्तसेवा**

मीरा रोड येथे राहणाऱ्या एका डॉक्टरची फास्ट टॅग रिचार्ज करण्यासाठी लिंक पाठवून केवायसी अपडेट करण्याने सांगून ९९ हजारांची फसवणूक केली आहे. या प्रकरणी नवघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सायबर गुन्हेगार हे आता ऑनलाइन फसवणूक करण्यासाठी फास्ट टॅगचा देखील वापर करत आहेत. भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणद्वारे इलेक्ट्रॉनिक टोल संकलन प्रणाली ( फास्ट टॅग ) ही एक ऑनलाइन यंत्रणा आहे ज्यासाठी देशभरातील टोल संकलनासाठी प्रीपेड रिचार्ज करणाऱ्या वाहनांच्या काचेवर रेडिओ फ्रिक्वेन्सी आयडेंटिफिकेशन स्टिकर्स चिकटवले जातात. आता हे रिचार्ज करण्याच्या नावाखाली देखील सायबर गुन्हेगारांनी सुरुवात केली आहे. यामुळे नागरिकांना काळजी घेणे आवश्यक आहे. अशीच एक घटना भाईंदर पूर्वेतील जानकी अव्हेन्यूमध्ये राहणारे डॉ. संतोष पांडे यांचे मिरारोड येथे रुग्णालय आहे. डॉक्टर कारमधून मुंबईला जात असताना टोल भरण्यासाठी फास्ट टॅगमध्ये शिल्लक रक्कम कमी असल्याचे त्यांच्या लक्षात आले. ते रिचार्ज करण्यासाठी त्यांनी बँकेच्या ग्राहक सहायता क्रमांकावर संपर्क केला. तेव्हा आमचे प्रतिनिधी तुमच्याशी संपर्क करतील असे त्यांना सांगण्यात आले. काही वेळाने अनोळखी क्रमांकावरून त्यांना फोन आला. त्याने मोटारीचा क्रमांक मागितला तो पांडे यांनी दिला. त्याने पांडे यांना एक लिंक पाठवून बँक खात्याचे केवायसी अपडेट करण्यास सांगितले. त्यानुसार पांडे यांनी ती लिंक उघडली त्यानंतर काही वेळाने त्यांच्या बँक खात्यातून ९९ हजार काढून त्यांची फसवणूक केल्याची घटना घडली आहे. सायबर गुन्हेगारांविरोधात नवघर पोलीस ठाण्यात माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या कलम ६६ (सी) आणि ६६ (डी) अन्वये फसवणूक केल्याप्रकरणी आयपीसी कलम ४२० अन्वये सायबर फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला.

## मोबाईल पळवणाऱ्यांना अटक

**मिरारोड :** अर्नाळा सागरी पोलीस ठाणे हद्दीत मोबाईलवर बोलत जाणाऱ्या व्यक्तींचे फोन घेऊन पळून जाणाऱ्या संजू पाटी (२५), आमिर तर्जम्मुल शेख (२२) या दुचाकीस्वारांना गुन्हे शाखेने अटक केली आहे. त्या दोघांकडून गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल व इतर मुद्देमाल असा १ लाख ३३हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. सुशांत चव्हाण हे विरार पश्चिमेच्या ग्लोबल सिटी या रस्त्यावरून फोनवर बोलत पायी जात होते. त्यावेळी दुचाकीवरून आलेल्या या आरोपींनी त्यांच्या हाताला हिसका मारून मोबाईल पळवला होता, अशी माहिती पोलिसांनी दिली.

पुढारी ५.५.२०

# वाहने चोरणाऱ्यास अटक

## २ रिक्षा, ७ दुचाकी जप्त

**मिरा रोड : पुढारी वृत्तसेवा**

विरार पोलीस ठाणे हद्दीत रिक्षा व दुचाकी चोरी करणाऱ्या आरोपीस अटक करण्यात आली आहे. सदर कारवाई गुन्हे शाखा कक्ष-३ च्या पथकाने केली. या कारवाईत तपासी पथकाने २ रिक्षा, ७ दुचाकी जप्त केल्या आहेत.

विरार पोलीस ठाणे हद्दीतील चंदनसार, विरार पूर्व येथे सोनू भगवान झा यांची ५० हजार रुपयांची दुचाकी उभी केली होती. सदर दुचाकी अज्ञाताने पळवली. या प्रकरणी विरार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील वसई-विरार परिसरात गेल्या काही महिन्यापासुन मोटारसायकल रिक्षा चोरी व जबरी चोरी गुन्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. वरिष्ठांनी आरोपी यांचा शोध घेवून हे गुन्हे उघडकीस आणण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार गुन्हे शाखा, कक्ष ३, विरार युनिटचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी विविध ठिकाणी तपास करून आरोपी रईस अकबर शेख (२६) यास ताब्यात घेतले. त्याच्याकडे तपास केला असता त्याने गुन्हा केल्याचे कबुल केले. त्याच्याकडून चोरीच्या २ रिक्षा व ७ दुचाकी असा ४ लाख ५५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करून त्याला अटक करण्यात आली आहे.

तपासादरम्यान रईस शेख याने विविध पोलीस ठाणे हद्दीत गुन्हे केल्याचे उघडकीस आले. विरार पोलीस ठाण्यात ४ गुन्हे, वालीव पोलीस ठाणे, नालासोपारा पोलीस ठाणे येथे गुन्हे केल्याचे उघडकीस आले आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास गुन्हे शाखा कक्ष -३ चे पोलीस पथक करत आहे.

Scanned with CamScanner

पुण्यनगरी ५.मा.१९

# उत्तनमध्ये बिबट्याचा वावर

**■ नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण**

**मीरा रोड :** भाईंदर पश्चिमेकडील मोर्वा व डोंगरी,



उत्तन, खोपरा ते गोराईपर्यंतच्या गावात बिबट्या मुक्त संचार करत आहे. बिबट्याचा वावर असल्याचे ग्रामस्थांच्या निदर्शनास आले आहे. तसेच त्याच्या पायाचे ठसे दिसल्याने भीतीचे वातावरण पसरले आहे. त्याला पकडण्यासाठी वनविभागाने त्या गावाच्या परिसरात कॅमेरे लावले आहेत.

भाईंदर पश्चिमेच्या या भागात काही महिन्यांपासून रात्रीच्या वेळेस बिबट्या फिरत असल्याचे नागरिक सांगतात. कुत्रे, कोंबड्यांची शिकार करत आहे. बिबट्या रात्रीच्या वेळी ग्रामस्थांच्या घराभोवती घिरट्या घालत आहे. खोपरा गावामध्ये रात्री बिबट्याचा मुक्काम असल्याने बिबट्या ग्रामस्थांच्या घराबाहेर आणि छतावर चढत असून, संपूर्ण परिसरात घबराट आहे.

ग्रामस्थांनी स्थानिक प्रशासनाला वारंवार सांगूनदेखील काहीच झाले नाही. गावकऱ्यांनी मनसेचे पदाधिकारी श्रेयस सावंत यांना याची माहिती दिली. त्यांनी तातडीने वनविभाग महाराष्ट्र शासन यांना संपर्क करून बिबट्याला पकडण्यासाठी पत्र दिले. त्या वेळी वनविभागाने खोपरा गावात कॅमेरे लावले आहेत. कॅमेरे लावल्यामुळे बिबट्याचा वावर कुठे आहे, याची माहिती मिळेल. त्यामुळे त्याला पकडता येईल. लवकरच बिबट्यापासून गावकऱ्यांची सुटका होईल, असे वनविभाग अधिकारी निखिल पाटील यांनी सांगितले.

पुण्यनगरी ५.मा.१९

# महापालिका वर्धापन दिनीच सर्व कार्यालये पडली ओस

**। मीरा रोड :** मीरा-भाईंदर महापालिकेचा २८ फेब्रुवारी हा स्थापना दिवस म्हणून साजरा केला जातो. २८ फेब्रुवारी हा स्थापना दिवस असल्यामुळे मनपा अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन लता मंगेशकर नाट्यगृह येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमाला सर्व अधिकारी, कर्मचारी गेल्यामुळे महापालिकेची सर्व कार्यालये ओस पडली होती. यामुळे महापालिका दप्तरी नागरिकांना मात्र काम न झाल्याने माघारी हाताने परतावे लागले.



मीरा-भाईंदर महापालिकेने २३ ते २८ फेब्रुवारी या दिवशी कला क्रीडा महोत्सव, वन महोत्सव अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन केले होते. २८ फेब्रुवारी या दिवशी महापालिकेचा स्थापना दिवस असल्यामुळे स्थापना दिनानिमित्त महापालिकेतील अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले होते. हा कार्यक्रम सकाळी ११ वाजता असल्यामुळे अधिकारी, कर्मचारी सकाळपासूनच कार्यक्रमाच्या ठिकाणी गेले होते. महापालिका सर्व कार्यालयांतील अधिकारी, सर्व कर्मचारी कामे सोडून या कार्यक्रमाला हजर होते. दररोज शहरातील शेकडो नागरिक कामासाठी महापालिका कार्यालयात येत असतात. महापालिका मुख्यालय व इतर कार्यालयांत कामासाठी येणाऱ्या नागरिकांना कोणतीही पूर्वसूचना नसल्यामुळे नागरिक हे मनपा दप्तरी कामासाठी येत होते. मनपा कार्यालयात आल्यानंतर कोणताही अधिकारी, कर्मचारी उपस्थित नसल्याचे सुरक्षा रक्षकाकडून नागरिकांना सांगितले जात होते. त्यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागला. आपले काम न करताच माघारी हाताने परतावे लागले. जन्म, मृत्यू नोंदणी, पाणीपुरवठा विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग कर्मचारी उपस्थित नसल्याने नागरिकांनी मनपा प्रशासनाविरोधात संताप व्यक्त केला आहे. कामे घेऊन आलेल्या दिव्यांग नागरिक, वरिष्ठ नागरिक, महिला यांनाही त्रास सहन करावा लागला आहे. मनपा अधिकारी, कर्मचारी यांच्यासाठी कार्यक्रम करणे चांगले आहे; परंतु हा कार्यक्रम सायंकाळी किंवा सुटीच्या दिवशी घेणे आवश्यक होते. कामाच्या दिवशी कार्यक्रम ठेवल्यामुळे कामाची रजा घेऊन महापालिकेत आलेल्या नागरिकांनी नाराजी व्यक्त केली. महापालिका अधिकारी, कर्मचारी नाचगाण्यामध्ये मश्गुल होते, तर शहरातील नागरिक मात्र त्रस्त आहेत, असाही काही नागरिकांनी आरोप केला आहे.

Scanned with CamScanner

पुण्यनगरी पा-नं२०



# मराठा आरक्षण : मराठवाड्यातील हजारो तरुणांची मुंबईकडे कूच

**▌आज आझाद मैदानावर धडकणार**

**▌मंत्रालयावर मोर्चा काढण्याचा इशारा**

▌**छत्रपती संभाजीनगर :** मराठा आरक्षणाचा प्रश्न तत्काळ निकाली काढण्यात यावा तसेच समाजाचे प्रलंबित प्रश्न त्वरित सोडवण्यात यावेत, या प्रमुख मागणीसाठी मराठा क्रांती ठोक मोर्चाने कायगाव ते मुंबई लाँग मार्च काढला आहे. कायगाव (ता. गंगापूर) येथे काकासाहेब शिंदे यांच्या स्मारकाला अभिवादन करून मंगळवारी मराठवाड्यातील हजारो कार्यकर्ते मुंबईकडे रवाना झाले. बुधवारी आझाद मैदानावर पोहोचताच ते जोरदार आंदोलन करणार आहेत. तसेच मराठा आरक्षणाचा तिढा कायम आहे. न्यायप्रविष्ट प्रकरणात राज्य सरकार वेळकाढूपणा करत आहे, असा आरोप मराठा क्रांती ठोक मोर्चाने केला आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर संघटनेने बुधवारी मंत्रालयावर मोर्चा काढण्याचा इशारा दिला आहे.

कायगाव (ता. गंगापूर) येथे काकासाहेब शिंदे यांच्या स्मारकाला अभिवादन करून मंगळवारी मराठवाड्यातील हजारो कार्यकर्ते मुंबईकडे रवाना झाले. समन्वयक रवींद्र काळे आणि रमेश केरे यांच्या नेतृत्वाखाली हा लाँग मार्च काढण्यात आला.

चाकण येथे मुक्काम करून हा लाँग मार्च बुधवारी सकाळी मुंबईत दाखल होणार आहे. राज्यभरातील समन्वयक व कार्यकर्ते एकत्र येऊन आझाद मैदानावर आंदोलन करणार आहेत. पोलिसांनी परवानगी दिल्यास महारॅली काढण्याचा समन्वयकांचा प्रयत्न आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पुरवणी मागण्यांत मराठा समाजाच्या प्रलंबित मागण्यांबाबतचा मुद्दा नाही. राज्य सरकार मराठा आरक्षणाचा मुद्दा मोडित काढत आहे. आरक्षण कधी देणार ते जाहीर करून मुख्यमंत्र्यांनी निश्चित कालमर्यादा जाहीर करावी, अशी मागणी करण्यात येत आहे. मराठा समाजाच्या प्रलंबित मागण्यांचा सरकारने गांभीर्याने विचार करावा, असे रवींद्र काळे म्हणाले.

Scanned with CamScanner

सकाळ पु.पा.२.

# आरोग्य सेवेसाठी शिवसेना आक्रमक

## डी. एम. पेटिटसह आचोळेतील प्रस्तावित रुग्णालयासाठी उपोषणाचा इशारा

विरार, ता. २८ (बातमीदार) : वसई-विरारकरांच्या आरोग्य सुविधांकरिता शिवसेना आक्रमक झाली आहे. नालासोपारा-आचोळे येथील सुसज्ज दोनशे खाटांचे रुग्णालय आणि वसई येथील सर डी. एम. पेटिट रुग्णालयातील प्रस्तावित जोडइमारतीचे काम तत्काळ मार्गी न लागल्यास लाक्षणिक उपोषण करण्यात येईल, असा इशारा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) जिल्हाप्रमुख पंकज देशमुख यांनी दिला आहे.

वसई-विरार महापालिकेच्या प्रभाग समिती 'ड' अंतर्गत येणाऱ्या नालासोपारा-आचोळे आरक्षण क्रमांक- ४५५ व सर्व्हे क्रमांक- ६ येथील प्रस्तावित सुसज्ज दोनशे खाटांच्या रुग्णालयाच्या कामाचे भूमिपूजन महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते ऑनलाईन पद्धतीने सप्टेंबर २०२१ मध्ये करण्यात आले होते. या कामासाठी वसई-विरार महापालिकेने १५ कोटी ८२ लाख इतक्या निधीची तरतूद केलेली आहे. या रुग्णालयाच्या कामासाठी कार्यदिशही काढण्यात आलेला होता; तर वसई येथील सर डी. एम. पेटिट रुग्णालयातील जोडइमारतीचे भूमिपूजन नोव्हेंबर २०२० मध्ये तत्कालीन पालकमंत्री दादाजी भुसे यांच्या हस्ते झाले होते. या कामासाठी पाच कोटी रुपयांची तरतूद पालिकेने केलेली आहे. या भूमिपूजनानंतर या रुग्णालयांचे काम तात्काळ मार्गी लागणे अपेक्षित होते; मात्र आचोळे येथील प्रस्तावित रुग्णालय वसईच्या एव्हरशाईन आचोळे स्मशानभूमीच्या जवळ होणार असल्याने याला नागरिकांचा विरोध असल्याचे कारण वसई-विरार महापालिकेकडून देण्यात आलेले आहे. त्यामुळे निश्चित जागी हे रुग्णालय न होता थोडे पुढे बांधले जाणार आहे. त्यासाठी सुधारित आराखडा तयार करून लवकरच या कामाला सुरुवात केली जाईल, अशी माहिती वसई-विरार महापालिकेच्या बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता राजेंद्र लाड यांनी दिली आहे; तर सर डी. एम. पेटिट रुग्णालयातील जोडइमारतीचे काम ठेकेदाराने माघार घेतल्याने रखडल्याची माहितीही पालिकेतून देण्यात आलेली आहे.

### ...तर सर्वस्वी पालिका जबाबदार

शहरात सामान्य नागरिकांना चांगल्या आरोग्य सुविधा मिळत नसल्याने मुंबई-ठाणे येथे जावे लागत आहे. प्रस्तावित रुग्णालयांच्या माध्यमातून वसई-विरारकरांना या सुविधा मिळतील, अशी आशा आहे. त्यामुळे या रुग्णालयांचे काम तातडीने मार्गी लागावे, अशी विनंती पंकज देशमुख यांनी पालिका आयुक्त अनिलकुमार पवार यांना पत्राद्वारे केली आहे. अन्यथा, वसई शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) यांच्या वतीने सर्वसामान्य नागरिकांच्या माध्यमातून आपल्याविरोधात पालिका मुख्यालयासमोर लाक्षणिक उपोषण करण्यात येईल. या वेळी होणाऱ्या किंवा घडणाऱ्या कोणत्याही अनुचित प्रकारास सर्वस्वी पालिका जबाबदार असेल, असा इशाराही देशमुख यांनी आयुक्तांना दिला आहे.

---

सकाळ पा.नं.५.

# खलिस्तान कधी बनू दिला जाणार नाही

## दहशतवादविरोधी मोर्चाचे अध्यक्ष बिट्टा यांचे प्रतिपादन

भाईंदर, ता. २८ (बातमीदार) : इतिहासात खलिस्तान हा देश कधीही नव्हता. हाताच्या बोटावर मोजता येतील एवढ्या व्यक्ती भारताविरोधात कारस्थान करत असतील, तर तो प्रयत्न हाणून पाडण्यात येईल. खलिस्तान कधीही बनणार नाही, ना कधी बनू दिला जाईल, असे प्रतिपादन अखिल भारतीय दहशतवादविरोधी मोर्चाचे अध्यक्ष मणिंदरजित सिंह बिट्टा यांनी मिरा रोड येथे व्यक्त केले. हुतात्मा मेजर कौस्तुभ राणे यांचे स्मारक आणि अमर ज्योतीचे लोकार्पण बिट्टा यांच्या हस्ते सोमवारी (ता. २७) रात्री करण्यात आले, त्या वेळी ते बोलत होते.

काही वर्षांपूर्वी दहशतवाद्यांच्या हल्ल्यात अनेक जण हुतात्मा झाले. त्या वेळी देशाच्या स्वातंत्र्यासाठी हौतात्म्य पत्करलेल्या स्वातंत्र्यसैनिकांचे आत्मे दुःखी झाले असतील, यासाठीच आम्ही स्वातंत्र्य मिळवून दिले का, असा प्रश्न त्यांना पडला असेल, परंतु आता परिस्थिती बदलली आहे. देशाची सीमा अधिक सुरक्षित झाली आहे. परराष्ट्र धोरणाबाबत अधिक ठोस भूमिका घेण्यात आली आहे. जिथे देशाचा प्रश्न निर्माण होतो, त्या ठिकाणी सर्वांनी एकत्र ठामपणे उभे राहिले पाहिजे, असे आवाहन बिट्टा यांनी केले. या वेळी आमदार प्रताप सरनाईक, आमदार गीता जैन, महापालिका आयुक्त दिलीप ढोले, हुतात्मा मेजर कौस्तुभ राणे यांचे वडील प्रकाश राणे व आई ज्योती राणे आदी उपस्थित होत्या.

### ३७० कलम हटवण्यास इच्छाशक्ती आवश्यक

३७० कलम हटवल्यास तिरंगा फडकावण्यासाठी कोणी शिल्लक राहणार नाही, असे एकेकाळी सांगितले जाते होते; मात्र प्रत्यक्षात ते हटवल्यानंतर काय झाले? ना दंगल झाली, ना गोळीबार झाला! घराघरात तिरंगा फडकावला गेला व भारत देश एक झाला. हे आधीही होऊ शकले असते; पण का झाले नाही, असा प्रश्न येणारी पिढी, हुतात्मा झालेल्यांची कुटुंबे नक्कीच विचारतील. राजकीय इच्छाशक्ती होती म्हणूनच हे घडले, असेही बिट्टा यांनी सांगितले.

### अखंड तेवत राहणारी अमरज्योत स्थापित

काश्मीरमध्ये दहशतवाद्यांशी लढताना हौतात्म्य आलेल्या मिरा रोडच्या मेजर कौस्तुभ राणे यांचे स्मारक कनाकिया परिसरातील उद्यानात उभारण्यात आले. या ठिकाणी अखंड तेवत राहणारी अमर ज्योतही स्थापित करण्यात आली. आमदार प्रताप सरनाईक यांच्या संकल्पनेतून व आमदार निधीतून हे स्मारक उभारण्यात आले आहे.

Scanned with CamScanner

# लाखो रुपये माल के साथ तीन आरोपी धर दबोचे गए

अजहर शेख : संवाददाता

**वसई :** एमबीवीवी पुलिस आयुक्तालय अंतर्गत क्राइम ब्रांच ३ की टीम को एक बड़ी सफलता हाथ लगी है, दरअसल वाहन चोरी व जबरन लूटपाट मामले में ३ शातिर अपराधियों को धर दबोचा है, तथा ९ मामलों की गुत्थी सुलझाई है औरलाखों रुपये का माल जप्त कर आगे की तहकीकात कर रही है। यह सफलता डीसीपी क्राइम अविनाश अंबुरे, एसीपी अमोल मांडवे के मार्गदर्शन में क्राइम ब्रांच ०३ पी.आई प्रमोद बड़ाख की टीम ने पाई है, पुलिस अधिकारी ने यह जानकारी मंगलवार को दी है। पुलिस ने बताया कि १८ फरवरी को रात्रि लगभग १०:३० सोनु भगवान झा (२९) की विरार पूर्व से ५०,००० रुपये रुपये कीमत एक्टिवा मोटरसाइकिल अज्ञात चोर चोरी कर फरार हो गए थे, इस मामले में विरार थाने में अज्ञात चोर के खिलाफ केस दर्ज किया गया था। पुलिस ने बताया कि मीरा-भाईदर, वसई-विरार पुलिस आयुक्तालय, वसई-विरार क्षेत्र में पिछले कुछ महीनों से, मोटरसाइकिल, रिक्शा चोरी और जबरन चोरी के अपराधों की संख्या दिन-प्रतिदिन बढ़ रही है, वरिष्ठों ने इसे गंभीरता से लिया और आरोपियों को ट्रेस कर अपराध का पर्दाफाश करने के निर्देश दिए, तद्नुसार, गुप्त सूचना एवं तकनीकी विश्लेषण के माध्यम से क्राइम ब्रांच ३, विरार यूनिट के पुलिस अधिकारियों एवं कर्मचारियों द्वारा प्राप्त सूचनाओं के आधार पर रईस अकबर शेख (२६) को हिरासत में लिया, टीम ने पूरी जांच करने के बाद, उस पर उसी अपराध का आरोप लगाया गया और २ रिक्शा और ७ मोटरसाइकिलों सहित ४,५५,०००/- रुपये का चोरी का सामान जब्त किया गया। शेख की गिरफ्तारी से कुल ६ मामलों (चोरी) का खुलासा हुआ। पुलिस के मुताबिक, ३ फरवरी को सुशांत शशिकांत चव्हाण (३०) के साथ दो अज्ञात लोगों ने जबरन मोबाइल छीन कर फरार हो गए थे, इस मामले में अर्नाला सागरी पुलिस स्टेशन में कलम ३९२,३४ के तहत केस दर्ज किया गया था।पुलिस ने बताया कि मुखबिर द्वारा प्राप्त सूचना एवं तकनीकी विश्लेषण के आधार पर उक्त अपराध में आरोपी संजु राजु पाटील (२५) व आमिर जम्मुल शेख (२२), दोनो आरोपी नालासोपारा पूर्व के रहने वाले है,इनके पास से टीम ने अपराध में प्रयुक्त वाहन और जबरन चोरी किया गया १,३३,५००/- रुपये का सामान जब्त किया गया, तथा ३ लूटपाट की गुत्थी सुलझाई है।



Scanned with CamScanner

CMYK

MHT

राष्ट्रीय हिन्दी दैनिक

# मुंबई हिंदमाता टाइम्स

मुंबई,बुधवार 01 मार्च 2023

संपादक : विजय आर. सिंह | RNI No. MAHHIN/2006/20347 | E-mail: mumbaihindmatatimesnews@gmail.com | Website : www.mumbaihindmatatimes.com | वर्ष-१८, अंक-५१ | पृष्ठ-८ | मूल्य ₹५/- | संरक्षक:राजन पांडेय/सुमित आचार्य




सम-सामयिक घटनाओ की जानकारी रखने वाले अनुभवी,इच्छुक महिला व पुरूष पत्रकारो की आवश्यकता है। वेतन योग्यतानुसार दिया जाएगा। मो०-9867614765

-संपादक

| आज का पंचाग | सूर्योदय / सूर्यास्त | आज का मौसम | तापमान | शेयर बाजार | सर्राफा बजार |
|---|---|---|---|---|---|
| तिथि, नक्षत्र, वार, योग और करण है। | 6.50am 6.16pm | सुबह मौसम थोड़ी ठंड दिन में तापमान बढ़ने की संभावना | अधिकतम 33°C न्यूनतम 29°C | NSE OPEN 17,303.95 \| CLSOE 17,255.20 BSE OPEN 59,483.72 \| CLOSE 58,795.97 | GOLD 57,190 Per 10 Gm SILVER 66,800 Per Kg |

# वसई विरार क्राइम ब्रांच 3 को मिली कामयाबी

# लूटपाट -वाहन चोरी करने के वाले 3 अपराधी गिरफ्तार

## 2 ऑटो, 7 मोटर साईकिल, और 9 मामलो का खुलासा




**वसई।** एमबीवीवी पुलिस आयुक्तालय अंतर्गत क्राइम ब्रांच 3 की टीम को एक बड़ी सफलता हाथ लगी है,दरअसल वाहन चोरी व जबरन लूटपाट मामले में 3 शातिर अपराधियों को धर दबोचा है,तथा 9 मामलों की गुत्थी सुलझाई है औरलाखों रुपये का माल जप्त कर आगे की तहकीकात कर रही है। यह सफलता डीसीपी क्राइम अविनाश अंबुरे, एसीपी अमोल मांडवे के मार्गदर्शन में क्राइम ब्रांच 3 पीआई प्रमोद बड़ाख की टीम ने पाई है,पुलिस अधिकारी ने यह जानकारी मंगलवार को दी है। पुलिस ने बताया कि 18 फरवरी को रात्रि लगभग 10;30 सोनु भगवान झा (29) की विरार पूर्व से 50,000 रुपये रुपये कीमत एक्टिवा मोटरसाइकिल अज्ञात चोर चोरी कर फरार हो गए थे,इस मामले में विरार थाने में अज्ञात चोर के खिलाफ केस दर्ज किया गया था।पुलिस ने बताया कि मीरा-भाईदर, वसई-विरार पुलिस आयुक्तालय, वसई-विरार क्षेत्र में पिछले कुछ महीनों से, मोटरसाइकिल,रिक्शा चोरी और जबरन चोरी के अपराधों की संख्या दिन-प्रतिदिन बढ़ रही है,वरिष्ठों ने इसे गंभीरता से लिया और आरोपियों को ट्रेस कर अपराध का पदार्फाश करने के निर्देश दिए, तदनुसार,गुप्त सूचना एवं तकनीकी विश्लेषण के माध्यम से क्राइम ब्रांच 3,विरार यूनिट के पुलिस अधिकारियों एवं कर्मचारियों द्वारा प्राप्त सूचनाओं के आधार पर रईस अकबर शेख (26) को हिरासत में लिया,टीम ने पूरी जांच करने के बाद,उस पर उसी अपराध का आरोप लगाया गया और 2 रिक्शा और 7 मोटरसाइकिलों सहित 4,55,000/- रुपये का चोरी का सामान जब्त किया गया। शेख की गिरफ्तारी से कुल 6 मामलों (चोरी) का खुलासा हुआ। पुलिस के मुताबिक,3 फरवरी को सुशांत शशिकांत चव्हाण (30) के साथ दो अज्ञात लोगों ने जबरन मोबाइल छीन कर फरार हो गए थे,इस मामले में अनार्ला सागरी पुलिस स्टेशन में कलम 392,34 के तहत केस दर्ज किया गया था।पुलिस ने बताया कि मुखबिर द्वारा प्राप्त सूचना एवं तकनीकी विश्लेषण के आधार पर उक्त अपराध में आरोपी संजु राजु पाटील (25) व आमिर जम्मुल शेख (22),दोनो आरोपी नालासोपारा पूर्व के रहने वाले है,इनके पास से टीम ने अपराध में प्रयुक्त वाहन और जबरन चोरी किया गया 1,33,500/- रुपये का सामान जब्त किया गया,तथा 3 लूटपाट की गुत्थी सुलझाई है।

Scanned with CamScanner

लोकमत

न्यूज Inbox



# मराठी भाषा गौरव दिनी वाचकांचा सत्कार

**नालासोपारा :** मनपाच्या प्रभाग समिती एच मध्ये सोमवारी मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी अनेक विद्यार्थीचा तसेच वाचकांचा सत्कार करण्यात आला. प्रसिद्ध कवी प्रसाद कुलकर्णी, माजी महापौर नारायण मानकर, उपमहापौर प्रकाश रॉड्रिज, नितीन राऊत, संदेश जाधव, भरत गुप्ता, उमा पाटील, किरण चेंदवणकर यांच्या उपस्थितीत उत्साहात साजरा करण्यात आला. सहा. आयुक्त नीलेश म्हात्रे, उपायुक्त कुर्लेकर, प्रभाग समिती एच मधील स्टाफ , वाचनालय स्टाफ तसेच विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक,

Hello Vasai
Page No. 4 Mar 01, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner

लोकमत

गुन्हे शाखा युनिट-३ च्या पोलिसांचे यश

# वाहनांसह जबरी चोरी करणाऱ्या आरोपींना अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** गुन्हे शाखेच्या युनिट-३ च्या पोलिसांनी वाहन व जबरी चोरी करणाऱ्या तीन आरोपींना अटक केली आहे. या आरोपींकडून नऊ गुन्ह्यांची उकल करून ५ लाख ८८ हजारांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. पोलिस आयुक्तालयाचे जनसंपर्क अधिकारी विशाल धायगुडे यांनी मंगळवारी ही माहिती दिली.



गुन्हे शाखेच्या युनिट-३ च्या पोलिसांनी वाहनचोरी व जबरी चोरी करणाऱ्या आरोपींना अटक करून आरोपींकडून नऊ गुन्ह्यांची उकल करण्यात यश मिळवले आहे.

भाटपाड्याच्या साईराम चाळ येथे राहणाऱ्या सोनू झा (२९) यांची पन्नास हजारांची दुचाकी मेहता चक्कीजवळ, भाटपाडा येथे पार्क केली होती. १८ फेब्रुवारीला रात्री चोरट्यांनी ती चोरून नेली. विरार पोलिसांनी वाहन चोरीचा गुन्हा दाखल केला होता. वसई-विरार परिसरात गेल्या काही महिन्यांपासून दुचाकी, रिक्षा व जबरी चोरी गुन्ह्यांच्या प्रमाणात वाढ होत असल्याने वरिष्ठांनी गांभीर्याने दखल घेऊन आरोपींचा शोध घेण्याच्या सूचना केल्या होत्या. त्या अनुषंगाने गुन्हे शाखा, युनिट-३ चे पोलिस अधिकारी व अंमलदार यांनी आरोपी रईस अकबर शेख (२६) याला २१ फेब्रुवारीला ताब्यात घेऊन त्याच्याकडे तपास करून सहा गुन्ह्यांची उकल करत चोरीच्या २ रिक्षा व ७ दुचाकी असा एकूण ४ लाख ५५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. यानंतर आरोपी संजू राजू पाटील (२५) आणि आमिर तजम्मुल शेख (२२) या दोघांना २४ फेब्रुवारीला ताब्यात घेतले. आरोपींकडे चौकशी करून तीन गुन्ह्यांची उकल करत गुन्ह्यात वापरलेले वाहन व जबरी चोरी झालेला १ लाख ३३ हजार ५०० रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. ही कामगिरी पोलिस उप-आयुक्त (गुन्हे) अविनाश अंबुरे, सहायक पोलिस आयुक्त (गुन्हे) अमोल मांडवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक प्रमोद बडाख, पोलिस उपनिरीक्षक उमेश भागवत, शिवाजी खाडे आदींनी पार पाडली आहे.

## वसई-विरारमध्ये वाढले चोरीचे गुन्हे

३ फेब्रुवारी रोजी ग्लोबल सिटीत राहणारे सुशांत चव्हाण (३०) हे फोनवर बोलत पायी अग्रवाल ग्रुप बाजूकडे जात होते. त्यावेळी पतंजली दुकानासमोर पाठीमागून दुचाकीवरून आलेल्या दोन आरोपींपैकी एकाने त्यांच्या हातातील मोबाइल जबरीने हिसकावून चोरी करून पळून गेले. अर्नाळा पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. वसई-विरार परिसरात असे गुन्हे सतत घडत असल्याने वरिष्ठांनी गुन्ह्यांचा उलगडा करण्याच्या सूचना केल्या होत्या.

Hello Vasai
Page No. 4 Mar 01, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner